महत्त्वाचे

महेक शेखला मिळणार पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर : भारतीय संरक्षण मंत्रालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या वीरगाथा इव्हेंटमध्ये कनकशीळ (ता. खुलताबाद) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी महेक मुबीन शेख ही चित्रकला परीक्षेत विजेती ठरली आहे .त्यामुळे तिची राष्ट्रीय पुरस्कारासाठी पहिल्या शंभर विद्यार्थ्यांत निवड करण्यात आली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला दिल्ली येथे होणाऱ्या कार्यक्रमात महेक शेखला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू व संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांच्या हस्ते पुरस्कार दिला जाणार आहे. या स्पर्धेसाठी मुख्याध्यापक आप्पाराव नलावडे, शिक्षक विशाल टिप्रमवार यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सहशिक्षक सोहन सातदिवे, रवी शिखरे, मनोज शेळके, नारायण काळे, प्रभाकर गायकवाड आदींनी अभिनंदन केले.

रुग्णालयातील स्वच्छतागृहाला टाळे

बीड : जिल्हा रूग्णालयाच्या आवारात असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाला गेल्या ७ महिन्यांपासून टाळे लागले आहे. यामुळे सोनोग्राफीसाठी ताटकळत असलेल्या गर्भवती महिला, तसेच जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल रूग्णांना भेटण्यासाठी आलेले नातेवाईक, अपघाती रूग्ण व येणारे नातेवाईक यांनी नैसर्गिक विधीसाठी जायचे कुठे ? असा सवाल आता जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसह नातेवाईक आणि सामाजिक कार्यकर्ते विचारत आहेत.या रूग्णालयात जिल्ह्याच्या सर्वच तालुक्यातुन रूग्ण मोठ्या संखेने उपचारासाठी येतात. दरम्यान या सर्व प्रकाराकडे दुर्लक्ष करणारे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्याविषयी संताप व्यक्त केला जात असून, सार्वजनिक स्वच्छतागृह सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

वातावरण बदलाचा कांद्याला फटका

जालना : वातावरण बदलाचा फटका पुन्हा एकदा जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसताना दिसून येत आहे, सकाळी पडणारी थंडी त्यानंतर दिवसभर पडत असलेले कडाक्याचे उन यामुळे कांद्यावर करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे बघावयास मिळत आहे, यापूर्वीच अवकाळी पावसामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना चांगलाच फटका बसला आहे, परंतु त्यानंतरही वातावरणामध्ये सातत्याने बदल सुरूच असल्यामुळे शेती पिकाला याचा मोठा फटका बसत असल्याने शेतकऱ्यांना पुन्हा एकदा आर्थिक संकटाचा सामना करावा लागणार असे चित्र निर्माण झाले आहे. परिणामी शेतकरी चिंतातुर झाला आहे.

पशुधनाच्या भावात वाढ

बीड : एकीकडे पशुधनाचा सांभाळ करण्यासाठी पशुपालकांना मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असताना दुसरीकडे चांगल्या प्रतीच्या दुधाला देखील योग्य दर मिळत नसल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. बीड जिल्ह्यात दुधाला सर्वसाधारण २८ ते ३० रुपये भाव आहे, त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. त्यातच सध्या चारा,कडबा चांगलाच महागला आहे. त्यात दूध संकलन करून दूध डेअरीला पोहचवले जाते.पण त्याचा शेतकऱ्यांना काहीच फायदा होत नाही.शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळे सरकारने प्रति लिटर दुधाला ६० रुपये हमीभाव द्यावा अशी मागणी दूध उत्पादकातून होत आहे.

७५ टक्के उपस्थिती अनिवार्य

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विभागात, मॉडेल कॉलेज, संतपीठ येथे प्रवेशित पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. या संदर्भात पदव्युत्तर प्रवेश विभागाने परिपत्रक जारी केले आहे. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी विद्यापीठाच्या नामविस्तारदिनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर भाष्य केले. कमी पटसंख्या असली तरी चालेल, पण शिकण्याची इच्छा असणारे विद्यार्थी हवेत. अनावश्यक भरती नको, असे सांगत ७५ टक्के उपस्थिती नसेल तर संबंधितांना परीक्षेला बसू देऊ नका, असेही त्यांनी स्पष्ट केले होते.त्यानंतर दोन दिवसांत पदव्युत्तर प्रवेश विभागाने परिपत्रक जारी केले. त्यानुसार, प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनीने संबंधित वर्गात उपस्थित राहणे बंधनकारक असेल. अनुपस्थित विद्यार्थ्यांनी योग्य व वैध कारण पालकाच्या स्वाक्षरीसह विभागप्रमुखांकडे अर्जाद्वारे देणे बंधनकारक असेल. ७५ टक्के उपस्थिती नसल्यास परीक्षेला बसता येणार नाही.

जन्म दाखल्यासाठी अर्ज केला

सिल्लोड : महाराष्ट्रात २ लाख बांगलादेशी नागरिकांनी जन्म प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत. त्यापैकी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १०,०६८ अर्ज झाले असून, सिल्लोड तालुक्यात एकट्या ४,७३५ अर्ज आले आहेत, असा खळबळजनक आरोप भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी पत्रकार परिषदेत केला. प्रशासकीय यंत्रणेकडून चौकशी न करता आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, व बनावट रेशनकार्डच्या आधारे ४,७३५ अर्जदारांना जन्म प्रमाणपत्र देण्यात आले. विशेष म्हणजे, एकही अर्ज फेटाळण्यात आलेला नाही. किरीट सोमय्या यांनी ही माहिती उघड करत एटीएसकडून चौकशी होणार असल्याचे सांगितले. सोमवारी सिल्लोड येथील उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयात उपजिल्हा दंडाधिकारी लतीफ पठाण आणि तहसीलदार संजय भोसले यांची भेट घेऊन त्यांनी काही फाईली तपासल्या.

चुकीची कामे रद्द करणार

छत्रपती संभाजीनगर : जिल्हा नियोजन समितीने समान निधी वाटप केला नाही, शिवाय काही चुकीच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिल्याचे कळाले आहे, जनतेच्या पैशांचा असा अपव्यय होऊ देणार नाही. २६ जानेवारीनंतर डीपीसीची काही चुकीची कामे रद्द करणार असल्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सोमवारी पत्रकारांना सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, जिल्हा नियोजन समितीची कामे काही ठेकेदारांनी रिंग करून मिळविल्याची माहिती आहे.

फळबागा नसतानाही भरला पीक विमा

आष्टी तालुक्यात बोगस विमा भरल्याची माहिती उघड

बीड : प्रतिनिधी

बीड जिल्हा सध्या राज्यातच नाही तर देशभरात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे चर्चेत आहे. अशातच राज्य सरकारकडून शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना व फळपीक विमा योजना राबविण्यात येत असते. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लाभ मिळत असतो. मात्र या योजनेत बोगस विमा भरल्याचा प्रकार देखील बीड जिल्ह्यात समोर आला आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात बोगस फळपीक विमा भरल्याचे समोर आले असुन, त्याची तपासणी करून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

नैसर्गिक आपत्तीमध्ये फळबागांचे नुकसान होत असते. याला सुरक्षा कवच म्हणून फळपीक विमा योजना सुरु करण्यात आलेली आहे. अर्थात नैसर्गिक आपत्तीमध्ये पिकांचे किंवा बागांचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई शेतकऱ्यांना मिळत असते. याकरिता विमा सुरक्षा कवच कामी येत असते. मात्र यातच शेतकऱ्यांकडून गैरप्रकार होत असल्याचे आता समोर येत आहेत. विषेश म्हणजे ज्याठिकाणी बागा नाहीत अशा ठिकाणी देखील फळ बाग दाखवून विमा उतरविण्यात आला असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

दरम्यान, बोगस पिकविम्यावरून आरोप प्रत्यारोप होत असताना आता बीडच्या आष्टी तालुक्यात बोगस फळपिक विमा भरल्याची माहिती समोर आली आहे.

आष्टी तालुक्यातील केरुळ, कडा, धामणगाव, बिरंगुळवाडी या गावांतील ४० ठिकाणी प्रातिनिधिक स्वरूपात, कृषी विभागाकडून फळपीक तपासणी करण्यात आली. यातील केवळ १८ योग्य अर्ज आढळले आहेत. तर काही ठिकाणी फळपीक बागाच आढळल्या नाहीत.या तपासणी पथकामध्ये कृषी उपसंचालक, तंत्र अधिकारी, कृषी अधिकारी व कृषी पर्यवेक्षक यांचा समावेश होता.

सर्वच बागांची होणार तपासणी

ज्या जमिनीवर फळ बाग लावण्यात आलेल्या नाहीत अशा ठिकाणचा फळ पीक विमा उतरविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे आता कृषी विभागाकडून जिल्ह्यातील जितके फळ पीक विम्याचे अर्ज दाखल झाले आहेत. त्या सर्वच ठिकाणच्या फळबागांची तपासणी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामुळे आणखी किती बोगस फळपीक विमा समोर येतील हा पाहणे महत्वाचे ठरेल.

आवडीसह व्यावसायिकता जपणे आवश्यक

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

चित्रपट बनवत असताना आपण आपली आवड जोपासत व्यावसायिक गोष्टींकडे जागरूकपणे पाहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन दिग्दर्शक फराह खान यांनी केले. नुकताच जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा-वेरूळ (एआयएफएफ) आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप झाला. या सोहळ्यात बॉलिवूडची स्टार नृत्य आणि चित्रपट दिग्दर्शक फराह खान यांनी मास्टरक्लासमध्ये उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी फराह बोलत होती. दिग्दर्शक जयप्रद देसाई यांनी या मास्टरक्लासचे संचलन केले. त्याला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पुढे बोलताना फराह खान म्हणाली, गाण्यातून चित्रपटाची कथा पुढे जाणे गरजेचे आहे. आयटम सॉंगपेक्षा अशी गाणी करणे मला जास्त आवडेल. एक कोरिओग्राफर आणि दिग्दर्शक म्हणून मला ही माझी ताकद वाटते. स्वप्न पाहिली तरच ती पूर्ण करण्याची ताकद तुमच्यात येत असते. कोरिओग्राफी आणि डायरेक्टर या दोन्ही जबाबदाऱ्या माझ्यासाठी लर्निंग प्रोसेस होती. कोरिओग्राफर म्हणून काम करत असले तरी दिग्दर्शक म्हणूनच काम करायचे हे पक्के ठरवले होते. त्यामुळे ओम शांती ओम सारखा चित्रपट केवळ चौदा दिवसात लिहून पूर्ण झाला. आपली आवड आणि व्यवसायाची सांगड घालता आली तर नक्कीच उत्तम निर्मिती होते. माझ्यासाठी हीच बाब कायम महत्त्वाची आहे, असे फराह खान म्हणाली.

इतरांसारखे वागण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा स्वतःचे वेगळेपण जपत काम करत राहणे गरजेचे आहे. तुम्ही जे स्वप्न पाहता ते ही सत्यात उतरवविण्यासाठी प्रचंड मेहनत काम करा. आपल्या आयुष्यात असणाऱ्या अडचणी संदर्भात स्वतः कारणे देण्यापेक्षा काम करत राहिले पाहिजे. या जगात अशक्य असे काहीच नाही, केवळ आपण विश्वास ठेवत मेहनत करणे आवश्यक आहे, असेही ती म्हणाली.

अजित पवारांच्या ताफ्याला दाखवले काळे झेंडे

जालना : प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना न्याय मिळत नाहीये,या घटनेचा निषेध आणि अजित पवारांनी बीडचे पालकमंत्री पद का स्वीकारले? असे म्हणत मराठा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्याला आज जालना शहरातील भोकरदन नाका तेथे काळे झेंडे दाखवत आंदोलन केले. उपमुख्यमंत्री पवार राष्ट्रवादी कार्यालयाच्या उद्‌घाटनासाठी आले होते.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खून प्रकरण आणि परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी याचा पोलिस कोठडीत झालेला मृत्यू या दोन्ही प्रकरणाचा निषेध नोंदवण्यासाठी अखिल मराठा महासंघाच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवण्यात आले.अजित पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाले याचाही आंदोलकांनी निषेध केला. सरपंच संतोष देशमुख खून प्रकणात आरोप होत असलेले मंत्री धनंजय मुंडे त्यांच्याच पक्षाचे आहेत. खुन प्रकरणाचा तपास हा कुठल्याही राजकीय दबावाशिवाय होण्यासाठी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे दुसऱ्या नेत्याकडे द्यायला हवे होते. परंतु अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्री पद स्वीकारले, एका अर्थाने ते मुंडे यांना पाठीशी घालण्याचे काम करत आहेत, असा आरोप करत भारतीय मराठा महासंघाने अजित पवारांचा निषेध नोंदवला, असे आंदोलक अरविंद देशमुख यांनी म्हटले.

पैठण-बारामती रोडवर अपघाताची भीती

आष्टी : तालुक्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग सावलखेड ते आष्टी या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. मागील दोन वर्षांपासून या रस्त्याचे काम चालू आहे. अनेकदा निवेदने देऊनही ठेकेदाराने काम पूर्ण केलेले नाही.या राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा पैठण - बारामती रोड जात असून या रोडवरून मिरजगाव मार्गे ऊस वाहतूक मोठया प्रमाणात होत असते. अगदी कडा शहरापासून काही अंतरावर गेल्यावर शेरी बु. येथे जोडणाऱ्या बारामती रोडवर भले मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे रात्री अपरात्री वाहनधारकाच्या लक्षात न आल्यास मोठ्या अपघाताची शक्यता आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी तातडीने दुरुस्ती करून खड्डा बुजविण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिपक सोनवणे यांनी पत्रकाद्वारे केली आहे. नव्याने झालेल्या राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावर कोणतेही दिशा दर्शक फलक नाहीत. धोक्याच्या ठिकाणी मोठमोठे पुलाचे काम चालू असून त्याठिकाणी फक्त रेबिन बांधल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे.

छ. संभाजीनगरात चोरीचे सत्र सुरूच

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

जिल्ह्यात चोरीचे सत्र सुरूच असून, चोरट्यांना पोलिसांचा धाक राहला नाही, असे चित्र निर्माण झाले आहे. शहरातील प्रोझोन मॉलच्या समोर असलेल्या हनफिज मोबाइल कलेक्शनचे शटर उचकटून चोरट्यांनी महागड्या आयफोन, सॅमांग आदी कंपन्यांचे १६० मोबाइल लंपास केले आहेत. या मोबाइलची किंमत ४० लाख ८८ हजार ८४८ रुपये एवढी होती. ही घटना १६ जानेवारीच्या रात्री घडली. याप्रकरणी १८ जानेवारी रोजी रात्री दहा वाजता एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

यासंदर्भात मोबाइल शॉप मालक अब्रार जावेद हनफी (रा. जयसिंगपुरा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे प्रोझोन मॉलसमोर हनफिज मोबाइल कलेक्शन आहे. १६ जानेवारीच्या रात्री १० वाजता दुकान बंद करून घरी गेले होते. त्याच मध्यरात्री १२.३० वाजेनंतर एका विनाक्रमांकाच्या कारमधून चार चोरटे तेथे आले. त्यांनी मोबाइल कलेक्शनच्या शटरला कुलूप लावण्यासाठी असलेली लोखंडी पट्टी एक घाव घालून तोडली. त्यानंतर आतील काच फोडून दोन चोरटे घुसले आणि दोघे बाहेर थांबले. आत घुसलेल्या चोरांनी दुकानातून विविध कंपन्यांचे सुमारे १६० मोबाइल लंपास केले. दरम्यान, दुसऱ्या दिवशी सकाळी दुकान उघडताना हा प्रकार लक्षात आला. याप्रकरणी अधिक तपास सहायक पोलिस निरीक्षक कैलास लहाने करीत आहेत.

तर दुसरी घटना फुलंब्रीतील मुर्शिदाबादवाडीत घडली. शेतामध्ये पाणी भरत असलेल्या शेतकऱ्याचे हातपाय बांधून त्यांच्या घरात घुसून चोरट्यांनी एकुण एक लाख ८२ हजार रुपयांचा ऐवज लंपास करून पोबारा केला. शनिवारी दि.१९ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास ही घटना घडली. आदिनाथ विटेकर यांच्या फिर्यादीवरून फुलंब्री पोलिस ठाण्यात संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस निरीक्षक संजय सहाने यांच्या मार्गदर्शनात तपास सुरू आहे.



मोबाईल चोरीची घटना सीसीटीव्हीत कैद

मोबाइल शॉपी लुटण्यासाठी आलेले चोरटे शॉपच्या शटरजवळ आल्यानंतर कुलपाला लावण्यासाठी असलेली लोखंडी पट्टी घाव घालून तोडली. त्यानंतर दोन चोरटे दुकानात शिरले. त्यानंतर एक बॅगसह तीन खोक्यांमध्ये मोबाइल भरून चोरटे लंपास झाले. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.

सुरेश धस यांच्याकडून माझ्या जीवाला धोका; खाडेंचा दावा

बीड : प्रतिनिधी

जिल्ह्यातील आष्टी मतदारसंघाचे भाजप आमदार सुरेश धस यांच्या देवस्थान जमीन घोटाळ्यांसह गैरकारभाराची माहिती बाहेर काढणाऱ्या आणि धस यांच्या विरोधात संभाजीनगर हायकोर्टात याचिका दाखल करणाऱ्या, सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांचे, कोर्टाने दिलेले पोलीस संरक्षण, कोणतीही पूर्वकल्पना न देता अचानक काढण्यात आले आहे. यामुळे माझे पोलीस संरक्षण पूर्ववत करण्यात यावे, माझ्या जीवितास आमदार सुरेश धस, पत्नी प्राजक्ता धस, देविदास धस यांच्यासह त्यांच्या दलालांकडून धोका आहे. असा आरोप खाडे यांनी केला आहे.

दरम्यान, या संदर्भात खाडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले असून, माझे पोलीस संरक्षण पूर्ववत करा, अशी मागणी केली आहे. राम खाडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटलंय, की आमदार सुरेश धस यांच्या विरोधातील भ्रष्टाचाराची, गुन्हेगारीची सर्व प्रकरणे उच्च न्यायालयात कार्यवाहीसाठी प्रलंबित आहेत. महसूल प्रशासन पोलीस प्रशासनामार्फत कायद्याने कोणतीही कारवाई होत नसल्याने, तपासात राजकीय हस्तक्षेप होत असल्याने उच्च न्यायालयात रि-पिटीशन दाखल केलेली आहे. या यंत्रणेवर दबाव आणण्यासाठी, त्यांच्यावर दहशत ठेवण्यासाठी संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येच्या माध्यमातून पोलिसांची तपासाची भूमिका ते जाहीर सभेत मांडत असून, पोलिसांना अप्रत्यक्ष आदेश देत आहेत, असा आरोपही खाडेंनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

धस यांच्याकडून प्रशासनाची दिशाभूल

आमदार सुरेश धस हे देवस्थान जमीन घोटाळा प्रकरणातील मुख्य आरोपी असून त्यांनी मीडियासमोर त्यांच्यावर झालेल्या सर्व आरोपातून क्लिनचिट देण्यात आली आहे, असं मीडियावर सांगून जनतेची आणि प्रशासनाची दिशाभूल केली आहे. पोलीस उपाधिक्ष, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांनी एफआयआर नुसार तपास केलेला नसताना, तपासासाठी वरिष्ठावरुन परवानगी मिळाली नसताना, त्यांना क्लिनचिट कोणी दिली? असा सवालही त्यांनी केला आहे.

एल्‌&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल्‌&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल्‌&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पू). मुंबई 00 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: औरंगाबाद

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे"** आणि **"जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 17.01.2025 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. गजानन उमाळकर 2. अंकिता उमाळकर	**वेळापत्रक-I** मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: अपार्टमेंट क्र.06, 47.44 चौ. मीटर बांधलेली जागा (37.76 चौ.मीटर चटई क्षेत्र) स्टिल्ट तिसऱ्या मजल्यावर सक्षम हाईट्स ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर-I, सिडको, गट क्र.173/p, तिसगाव, तालुका आणि जिल्हा औरंगाबाद येथे प्लॉट क्र.203 वर बांधण्यात आले आहे ज्याची सीमा खालीलप्रमाणे आहे. सिमा: पूर्व – जीना आणि अपार्टमेंट क्रमांक 05 आणि कॉमन टेरेस पश्चिम – साइड मार्जिन आणि 18 मीटर रुंद रस्ता उत्तर – साइड मार्जिन आणि 18 मीटर रुंद रस्ता दक्षिण – साइड मार्जिन आणि प्लॉट क्र. 202	H17776220621050100 / H17776220621050100L	12.11.2024	रु. 1,62,000/-	रु. 28,91,166.55/-	रु. 16,20,000/-	सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 या वेळेत पूर्व भेटीसह.	11.02.2025 दुपारी 12:30 ते 2.00 पर्यंत

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **10/02/2025** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी एलटीएफ द्वारे सदर जाहीर ई-लिलावाच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **11/02/2025** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **12/02/2025** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात जसे की नाव - श्री शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट क्रमांक 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो. त्याची आणि कोणतीही पूर्वसूचना न देता.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिव्हर्ड करून घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 21.01.2025
ठिकाण: औरंगाबाद

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल्‌&टी फायनान्स लिमिटेड